जा.क्र.उमा-३/११वीप्र/कोवि/२०२१-२२/ 16619-23
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
दिनांक – 15 AUG 2021

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, कोल्हापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

विषय :- इ. ११ वी. प्रवेश सन-२०२१-२२ बाबत सूचना
(कोल्हापूर व गडहिंग्लज शहरस्तरीय केंद्रीय प्रवेश वगळून)

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविणेत येते की, **सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व **उच्च माध्यमिक मंडळामार्फत आयोजत करण्यात येणारी** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) रद्द करण्यात आली व सदर परीक्षेचा निकाल १० वी च्या मुल्यमापन पध्दतीनुसार घोषित करण्यात आला आहे. सबब सन २०२१-२२ ची इयत्ता ११ वी ची प्रवेश प्रक्रिया दि.१८.०८.२०२१ पासून सुरु करण्यात यावी. **प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक सोबत जोडले आहे.**

आपल्या जिल्हयातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्य/मुख्याध्यापकांना **इ.११ वी प्रवेश सन २०२१-२२ बाबत खालील प्रमाणे सूचना देण्यात याव्यात:-**

१. इ.११ वी प्रवेश प्रक्रिया राबवत असताना शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय **दि. २६ जून,१९९७ मधील** तरतुदी, व त्यानंतर वेळोवेळी शासनाने प्रवेशासंबंधी निर्गमित केलेल्या शासन आदेश व शासन पत्रांतील तरतुदींचे पालन करणे.

२. **सद्यस्थितीत कोरोना विषाणू प्रादुर्भावामुळे निर्माण झालेली परिस्थिती मधील सर्व नियम पाळणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने प्रवेश प्रक्रियेसाठी शक्य असल्यास कनिष्ठ महाविदयालयस्तरावर ऑनलाईन पध्दतीचा वापर करणे सोईस्कर होईल, त्यादृष्टीने नियोजन करणे.**

३. ऑनलाईन पध्दतीने विदयार्थ्यांचा प्रवेश अर्ज व संबंधित कागदपत्रे घेवून प्रवेश निश्चित करावा. तसेच इ.११ वी प्रवेशासाठी आवश्यक शैक्षणिक शुल्क हे ऑनलाईन ( Payment Gateway, Google Pay, Paytem, UPI, Phone Pay, Debit, Credit Card, Net Banking इ. ) माध्यमाव्दारे भरण्याची सूविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

४. ज्या ठिकाणी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश करणे शक्य नाही तेथे अंतराचा निकष व शासनाने कोविड-१९ बाबत घालून दिलेले निकष पाळून टप्या-टप्याने विद्यार्थ्यांना बोलावून प्रवेश प्रक्रिया पार पाडावी. प्रवेश प्रक्रियेवेळी महाविदयालयामध्ये गर्दी होणार नाही याबाबत दक्षता घेण्याची सूचना द्यावी.

५. अनुदानित तुकडयातील वाढीव विद्यार्थी क्षमतापूर्ण झालेनंतरच क्रमाने विनाअनुदानित तुकडयामधील प्रवेश क्षमता पूर्ण करावी.

६. इ. १० वी उत्तीर्ण झालेल्या व इ. ११ वी वर्गात प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना इ. ११ वी वर्गात प्रवेश मिळेल तसेच इ. ११ वी. प्रवेशाविना विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. इ. ११ वी प्रवेश देतांना मंजूर क्षमतेपेक्षा जादा प्रवेश देणेत येवू नयेत जेणे करुन परिसरातील मंजूर तुकडयावर अनिष्ट परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी.

इ.११ वी. प्रवेशाबाबत पालक व विद्यार्थी यांना नाहक त्रास होणार नाही व कोणत्याही प्रकारची तक्रार या कार्यालयास प्राप्त होणार नाही दक्षता घ्यावी. आपल्या जिल्हयातील इ. ११ वी. प्रवेश प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पाडणेचे दृष्टीने योग्य ते नियोजन करावे. **कोविड-१९ प्रादुर्भाव रोखणेसाठी सर्व निकष पाळून प्रवेश प्रक्रिया कमीत-कमी वेळेत पूर्ण होण्यासाठी सर्व घटकांना सहाय्य करण्याचे निर्देश देण्यात यावेत.**

(स.ध.सोनवणे)
**शिक्षण उपसंचालक,**
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

## इयत्ता ११ वी. प्रवेश प्रक्रिया सन २०२१-२२ कोल्हापूर विभागाचे वेळापत्रक

### कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयांसाठी
### (कोल्हापूर शहर व गडहिंग्लज शहर वगळून)

| दिनांक | वार | कालावधी | कार्यवाही |
|---|---|---|---|
| १८.०८.२०२१<br>२०.०८.२०२१<br>२१.०८.२०२१<br>२३.०८.२०२१ | बुधवार<br>शुक्रवार<br>शनिवार<br>सोमवार | ४ दिवस | फॉर्म देणे व स्विकारणे. |
| २४.०८.२०२१<br>२५.०८.२०२१<br>२६.०८.२०२१ | मंगळवार<br>बुधवार<br>गुरुवार | ३ दिवस | प्रवेश अर्जाची छाननी, तपासणी व गुणवत्ते नुसार निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करणे. |
| २७.०८.२०२१ | शुक्रवार | १ दिवस | दुपारी ३-०० वाजेपर्यंत निवड यादी व प्रतिक्षा यादी सूचना फलकावर लावणे. |
| २८.०८.२०२१<br>३०.०८.२०२१<br>३१.०८.२०२१<br>०१.०९.२०२१ | शनिवार<br>सोमवार<br>मंगळवार<br>बुधवार | ४ दिवस | निवड यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. |
| ०२.०९.२०२१<br>०३.०९.२०२१ | गुरुवार<br>शुक्रवार | २ दिवस | प्रवेश शिल्लक असल्यास प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना मूळ कागदपत्राच्या आधारे प्रवेश देणे. |
| ०४.०९.२०२१<br>०६.०९.२०२१ | शनिवार<br>सोमवार | २ दिवस | दुसऱ्या प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश शिल्लक असतील तर मूळ कागदपत्रांच्या आधारे प्रवेश देवून प्रवेश प्रक्रिया पुर्ण करणे. |
| ०७.०९.२०२१ | मंगळवार | कनिष्ठ महाविद्यालयातील इ.११ वी वर्ग ऑनलाईन पध्दतीने सुरु करावे. प्रत्यक्ष वर्ग सुरु करणेबाबत शासनाकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर अवगत करण्यात येईल. | |

(स.ध.सोनवणे)
**शिक्षण उपसंचालक,**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापू**